नियमित फौजदारी खटला नं.८४२/२०२०
निशाणी-२७

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः- निरामय राजेंद्र पवार

वयः- २५ वर्षे, धंदाः- शिक्षण

राहणारः- दिघी पुणे

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-</u>

१. मी आरोपीला ओळखतो. मी दि. १२/१२/२०१६ रोजी १४.३० वा. सुमारास श्रीराम चौकात उभा होतो. तेथे माझ्या ओळखीचे अक्षय वाडेकर, संकेत वाडेकर व त्यांचे सोबत दोन अनोळखी इसम दोन दुचाकी वाहनावर आले. त्यांनी मला बोलाविले व माझ्याशी महत्वाचे बोलायचे आहे असे म्हटले. ते मला महत्वाचे बोलायचे आहे असे सांगुन शिवनेरी अपार्टमेंट, नालेगाव येथे घेऊन गेले. मी त्यांचे मोटार सायकलवर बसुन गेलो. तेथे गेल्यानंतर आमची बहिण साक्षी वाडेकर हिला मोबाईलवर मिस्ड कॉल देतो व फोन करतो असे म्हणुन अक्षय वाडेकर व संकेत वाडेकर यांनी व त्यांचे सोबत असलेल्या दोन अनोळखी इसमांनी मला शिवीगाळ करुन मारहाण करायला सुरुवात केली. संकेत वाडेकर यांने त्याचे हातातील काहीतरी वस्तुने माझ्या उजव्या गालावर जोरात मारहाण केली. त्यामुळे माझ्या गालाच्या हाडावर इजा होऊन सुज आली. अक्षय व इतर इसमांनी मला जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच त्यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण व शिवीगाळ केली. त्यामुळे मी आरोपीं विरुध्द कायदेशीर तक्रार दिली. आता मला दाखविण्यात आलेली तक्रर तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>नि. २८</u> देयात येते. छापील फिर्यादवर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. छापील फिर्यादला <u>नि. २९</u> देण्यात येते. त्यानंतर पोलिसांनी मला यादी देवुन सरकारी दवाखान्यात पाठविले. मला आता यादी दाखविली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास <u>नि. ३०</u> देण्यात येते. मी सरकारी दवाखान्यात दोन दिवस भरती होतो. डॉक्टरांनी सांगितलेल्या काही तपासण्या मी सरकारी दवाखान्यात उपलब्ध नसल्यामुळे बाहेर केल्या. त्याबाबतचे कागदपत्र मी पोलिसांना दिले होते. मला अहमदनगर येथील सरकारी दवाखान्यातुन ससुन हॉस्पीटल,

पुणे येथे पाठविले होते. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही.

<u>उलट तपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. ए. ए. निबाळकर यांचेकडून:-</u>

२. माझे शिक्षण एम. टेक. पर्यत झाले आहे. मी १०वी. पर्यत भाऊसाहेब फिरोदिया हायस्कुल मध्ये होतो. हे म्हणणे खरे आहे की,आरोपीची बहिण साक्षी ही सुध्दा त्याच हायस्कुलमध्ये होती. मी दहावीत असताना ती कितवीला होती हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, शाळेत असताना माझे व आरोपीचे बहिणीचे बोलणे व्हायचे. हे म्हणणे खरे नाही की, मी तिच्या फोनवर मिस्ड कॉल देणे व फोन करणे हे कायम सुरु असायचे. हे म्हणणे खरे नाही की, शाळेत जाताना व शाळा सुटल्यानंतर मी कायम तिचा पाठलाग करुन तिला त्रास देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, साक्षी मला नेहमी बोलु नको, मोबाईलवर मिस्ड कॉल देऊ नको आणि त्रास देऊ नको असे म्हणत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीला ओळखत होतो. साक्षीदार सांगतो ती शाळेत होती एवढे मला माहित आहे. आरोपी सोबत बासकेट बॉल खेळत असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी अक्षय व संकेत यांनी मला वेळोवेळी साक्षीला बोलु नको, मोबाईलवर मिस्ड कॉल देऊ नको आणि त्रास देऊ नको असे सांगत होते. हे म्हणणे खरे नाही की, तरीही मी त्यांचे काही न ऐकता साक्षीला त्रास देणे सुरु ठेवले.

३. माझे वडिल डॉक्टर असुन त्यांचे हॉस्पीटल नगरमध्ये वसंत टेकडी येथे राहत्या ठिकाणी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल डॉक्टर असल्यामुळे माझी नगर शहरातील डॉक्टर तसेच सरकारी दवाखान्यातील डॉक्टर यांचेशी चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, डॉक्टर विनोद मोरे हे माझ्या वडिलांचे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/१२/२०१६ रोजी आरोपी मला त्यांचे बहिणीला त्रास देऊ नको व तिच्या मागे फिरु नको असे समजावुन सांगायला आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी घाबरलो व माझ्या विरुध्द छेडछाडीचा गुन्हा दाखल होईल या भितीने गाडीवर जात असताना गाडी स्लीप होऊन खाली पडलो व त्यात मला जखमा झाल्या. मी गाडीवरुन पडलो नाही.

४. मी पोलीस स्टेशनला साधारणतः किती वाजता गेलो हे मला घटना जुनी असल्यामुळे निश्चीतपणे आठवत नाही. साक्षीदाराला फिर्याद नि. २८ दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद दयायला सायंकाळी ०७.२९ वा. गेलो. हे

म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पोलीस स्टेशनची यादी घेऊन सरकारी दवाखान्यात गेलो. मी सरकारी दवाखान्यात किती वाजता गेलो हे मला आता आठवत नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कुठल्याही प्रकारची मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या बहिणीला त्रास देत असल्यामुळे ते मला समजावुन सांगत होते व याचा राग माझ्या मनात असल्यामुळे मी त्यांचे विरुध्द सदर खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी संकेत याने मला टणक वस्तुने मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशी कुठलीही घटना झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला झालेल्या जखमा या मी गाडीवर जोरात जात असताना पडल्यामुळे झालेल्या जखमा आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकुर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.11.04 12:01:23 +0530

(एल.एस.पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.०३/११/२०२५.